# सूचना

**विषय: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना नूतनीकरण (Renewal) २०२६-२७ बाबत.**
**(नूतनीकरण अर्ज सादर करण्याची मुदत १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत आहे).**

**संदर्भ : सहायक आयुक्त, समाज कल्याण कोल्हापूर-डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन विचारेमाळ कोल्हापूर यांचे जा.क्र./सआस ककाे/स्वाधार योजना/२०२६-२७/ यांचे दि. ०५/०८/२०२६ यांचे पत्रासअनुसरून( सोबत मूळ पत्र माहिती करीता जोडले आहे).**

स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व अनुसूचित जाती (SC) व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी स्वाधार योजना नूतनीकरण (Renewal) करण्याची ऑनलाईन प्रक्रिया अधिकृत पोर्टलवर सुरू झाली आहे. सर्वप्रथम सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिकृत https://hmasnew.mahait.org या नवीन पोर्टलद्वारे करणेची आहे.

**योजनेचा पुढील लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी खालील मुदतीत आणि दिलेल्या पद्धतीनुसार आपला अर्ज दि.१५ सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाईन सादर करावा.**

---

## १. ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया (Steps):

- **पोर्टलला भेट:** समाज कल्याण विभागाच्या महाडीबीटी/स्वाधार पोर्टलवर जा.
- **लॉगिन:** तुमचा जुना युझर आयडी व पासवर्ड वापरून लॉगिन करा.
- **नूतनीकरण पर्याय:** 'स्वाधार नूतनीकरण (Renewal) २०२६-२७' या लिंकवर क्लिक करा.
- **माहिती अपडेट:** चालू वर्षाचा वर्ग, कॉलेजचे नाव आणि मागील वर्षाचे गुण भरा.
- **अर्ज सबमिट:** अर्ज पूर्ण भरून सबमिट करा आणि त्याची प्रिंट **(Hard Copy)** काढून घ्या.

---

## २. जोडायची आवश्यक कागदपत्रे (Self-Attested Documents):

- **गुणपत्रिका:** मागील वर्षाची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (Marksheet).
- **बोनाफाइड:** चालू शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे बोनाफाइड प्रमाणपत्र (Bonafide).
- **फी पावती:** चालू वर्षाची कॉलेज प्रवेश फी पावती.
- **उपस्थिती प्रमाणपत्र:** मागील वर्षात ७५% उपस्थिती (Attendance) असल्याचे प्रमाणपत्र.
- **भाडे करारनामा:** वर्ष २०२६-२७ चा नोंदणीकृत भाडे करारनामा (Rent Agreement) आणि घरमालकाचे संमतीपत्र (लागू असल्यास).
- **बँक पासबुक:** आधार लिंक असलेल्या बँक खात्याच्या पासबुकची प्रत.

---

## ३. महत्त्वाच्या अटी व सूचना:

- विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार लिंक **(NPCI Mapping)** असणे सक्तीचे आहे, अन्यथा पैसे जमा होणार नाहीत.
  ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट आणि सर्व कागदपत्रांचा एक संच कॉलेजमधील स्वाधार लिपिकाकडे त्वरित जमा करावा.
- अंतिम तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

---

**स्कूल ऑफ इंजि. अँड टेक्नॉलॉजि/स्वाधार**
दिनांक: ०६/०८/२०२६

SHIVAJI UNIVERSITY
School of Engineering & Technology, Kolhapur

Director
School of Engineering & Technology,
Shivaji University, Kolhapur

महाराष्ट्र शासन
**सहायक आयुक्त, समाज कल्याण कोल्हापूर**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन विचारेमाळ कोल्हापूर
कोल्हापूर ०२३१-२६५१३१८ E-mail :- acswakolhapur@ gmil.com

जा.क्र. /सआसकको/स्वाधार योजन/२०२६-२७/ दि. ०५/०८/२०२६

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक / अधिष्ठाता
कोल्हापूर महानगर पालिका हद्दीतील व
तालुका मुख्यालयाच्या हद्दीतील सर्व महाविद्यालये.

विषय :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता नूतनीकरण अर्जाबाबत ...

संदर्भ :- मा. उपायुक्त ( शिक्षण ) समाजकल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,पुणे. यांचे दि . ०४/०८/२०२६ च्या बैठकीतील निर्देश.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने अंतर्गत अनु.जाती व नवबौध्द प्रवर्गातील शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विदयार्थांकरीता शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून ऑनलाईन पोर्टलवर सुरू करण्यात आलेले आहे.

त्या अनुषन्गाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून https://hmasnew.mahait.org या नवीन पोर्टलवर राबवण्यात येत आहे. सन २०२६-२७ करीत फक्त नूतनीकरण /Existing ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी दि.०५/०८/२०२६ ते दि.१५/०९/२०२६ पर्यंत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील जे विद्यार्थी नूतनीकरण/Existing अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना सदर मुदतीत ऑनलाईन अर्ज भरणेबाबत आपल्या स्तरावरून लेखी तसेच सोशल मीडिया द्वारे सूचना देण्यात याव्यात व योजनेपासून एकही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(सचिन साळे)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण,कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner